**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**श्री संत गुलाबराव महाराजांच्या साहित्यावर संशोधन करणाऱ्या संशोधकांकडून आर्थिक सहाय्यासाठी आवेदनपत्र आमंत्रित**

**जास्तीतजास्त संशोधकांनी आर्थिक सहाय्याचा लाभ घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन**

अमरावती -

दानदाते स्व. वासुदेवराव राजारामजी देशमुख यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून श्री संत गुलाबराव महाराजांचे जीवन, साहित्य, विचार, तत्वज्ञान, शिक्षण व कवितेवर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये आचार्य पदवीकरीता संशोधन करणाऱ्या एका संशोधकास प्रतिवर्ष रू. ६०००/- प्रमाणे दोन वर्षाचे एकूण रू. १२,०००/- संशोधन आर्थिक सहाय्य प्रदान करावयाचे आहे.

सदर आचार्य पदवीकरीता विद्यापीठामध्ये संशोधन करणाऱ्या संशोधकांना विहित नमुन्यात आवेदनपत्रे दि. ३० एप्रिल, २०२१ पर्यंत विद्यापीठाच्या वित्त विभागात जमा करुन आर्थिक सहाय्याचा लाभ घेता येईल. आवेदनपत्राचा विहित नमुना व इतर सविस्तर तपशील विद्यापीठाच्या वित्त विभागात निःशुल्क उपलब्ध असून सदर आर्थिक सहाय्याचा जास्तीतजास्त संशोधकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता वित्त व लेखा अधिकारी डॉ. भारत कऱ्हाड यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र. (७०३८३५२४७४) यावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०७/०४/२०२१

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी